मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# चाकण एमआयडीसीतील प्रश्नांवर सरकार ॲक्शन मोडमध्ये!

## उद्योगमंत्री सामंतांची पाहणी; रस्ते, वाहतूक व ड्रेनेज प्रश्नांवर कालबद्ध उपायांचे निर्देश

» पिंपरी | प्रतिनिधी

**चाकण एमआयडीसी परिसरातील रस्ते, वाहतूक कोंडी, पावसाच्या पाण्याचा निचरा, अतिक्रमणे, पार्किंग तसेच अन्य पायाभूत सुविधांच्या प्रश्नांची उद्योगमंत्री उदय सामंत यांनी रविवारी (दि.१६) प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेतला. पाहणीनंतर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी चाकण औद्योगिक वसाहतीतील विविध समस्या आणि त्यावर करावयाच्या कालबद्ध उपाययोजनांचे सविस्तर सादरीकरण केले.**



संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून तातडीच्या समस्या प्राधान्याने सोडवाव्यात तसेच भविष्यातील औद्योगिक विस्तार आणि वाढती वाहतूक लक्षात घेऊन दीर्घकालीन व शाश्वत उपाययोजना कराव्यात, अशा सूचना उद्योगमंत्री सामंत यांनी दिल्या.

या पाहणीवेळी उद्योगमंत्री सामंत यांच्यासोबत उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन, मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र सिंह कुशवाह, पीएमआरडीएचे आयुक्त अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएसआरडीसी, एमआयडीसी, पोलीस व अन्य संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि चाकण एमआयडीसीतील उद्योजक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

उद्योगमंत्री सामंत यांनी चाकण एमआयडीसीतील प्रमुख व अंतर्गत रस्ते, महत्त्वाचे चौक, वाहतुकीच्या दृष्टीने संवेदनशील ठिकाणे, पावसाचे पाणी साचणारी ठिकाणे, नाले, अतिक्रमणे, पार्किंगची उपलब्धता तसेच वाहतूक व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली. रस्त्यांची सद्यस्थिती, वाढती वाहनांची वर्दळ आणि औद्योगिक क्षेत्रातील वाहतुकीवर होणारा परिणाम याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. पाहणीनंतर झालेल्या सादरीकरणात जिल्हाधिकारी डुडी यांनी चाकण औद्योगिक वसाहतीतील विविध समस्या तसेच त्यावर करण्यात येणाऱ्या शॉर्ट, मिड आणि लॉंग टर्म स्वरूपाच्या उपाययोजनांची माहिती दिली. महामार्ग व अंतर्गत रस्ते, वाहतूक व्यवस्था, पावसाच्या पाण्याचा निचरा, वीज, वाहनतळ, अतिक्रमणे आणि नागरी सुविधांशी संबंधित प्रश्नांवर संबंधित विभागांकडून करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचे सादरीकरण करण्यात आले.

चाकण एमआयडीसी व लगतच्या प्रभावक्षेत्रातील विविध रस्त्यांची मालकी संबंधित विभागांनी निश्चित करावी. प्रत्येक विभागाने आपल्या अखत्यारितील रस्त्यांची माहिती संकलित करून आवश्यक कामांसाठी परस्पर समन्वयाने कार्यवाही करावी, अशा सूचना उद्योगमंत्री सामंत यांनी दिल्या. पावसाच्या पाण्याचा निचरा हा चाकण एमआयडीसीतील महत्त्वाचा प्रश्न असल्याने पाणी साचणारी ठिकाणे, नाले, नैसर्गिक पाण्याचे प्रवाह आणि विद्यमान निचरा व्यवस्था यांचा एकत्रित अभ्यास करून सर्वंकष स्टॉर्म वॉटर ड्रेनेज आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आवश्यक ठिकाणी स्टॉर्म वॉटर ड्रेन व चेंबर्स उभारण्यासोबतच वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी अंतर्गत रस्त्यांचे रुंदीकरण, जंक्शन सुधारणा, अतिरिक्त मार्गिका, साईड शोल्डरचा प्रभावी वापर तसेच आवश्यक ठिकाणी उड्डाणपुलांचे पर्याय तपासण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

वाहतुकीच्या दृष्टीने संवेदनशील ठिकाणे व 'रेड झोन' निश्चित करून त्यावर प्राधान्याने उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. पार्किंगच्या प्रश्नावरही पाहणीदरम्यान चर्चा झाली. मोठ्या उद्योगांनी त्यांच्या इकोसिस्टीममधील वाहनांची पार्किंग व्यवस्था त्यांच्या आवारात करण्यासाठी आवश्यक नियोजन करावे.

हेवी व्हेईकल्ससाठी उपलब्ध मोकळ्या जागेचा नियोजनबद्ध वापर करावा. पार्किंग व नो-पार्किंगची ठिकाणे निश्चित करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशा सूचना देण्यात आल्या. नाले व नाल्यांवरील अतिक्रमणांमुळे पावसाच्या पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा निर्माण होत असल्यास अशी अतिक्रमणे निश्चित करून नियमानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. संबंधित विभागांनी संयुक्त पाहणी करून आवश्यक कार्यवाही कालमर्यादेत पूर्ण करावी, असेही सांगण्यात आले. चाकण एमआयडीसीतील समस्यांच्या प्रभावी निराकरणासाठी जिल्हाधिकारी डुडी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीमार्फत विविध विभागांमध्ये समन्वय साधला जाणार आहे.

या समितीमार्फत दर शुक्रवारी कामांचा आढावा घेण्यात येणार असून उद्योगमंत्रीसामंत हे दर दोन महिन्यांनी चाकण एमआयडीसीला प्रत्यक्ष भेट देऊन कामांची पाहणी व आढावा घेणार आहेत. चाकण एमआयडीसीतील समस्यांकडे केवळ तात्पुरत्या उपाययोजनांच्या दृष्टीने न पाहता भविष्यातील औद्योगिक विस्तार, वाढती वाहतूक आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन अल्प, मध्यम आणि दीर्घकालीन एकात्मिक पायाभूत सुविधा विकासाचा आराखडा तयार करावा. रस्ते, वाहतूक, ड्रेनेज, वीज, पार्किंग, सार्वजनिक वाहतूक आणि अन्य नागरी सुविधांचा एकत्रित विचार करून कामे करावीत, असे उद्योगमंत्री सामंत यांनी स्पष्ट केले. चाकण हे राज्यातील महत्त्वाचे औद्योगिक केंद्र असून येथे मोठ्या प्रमाणावर उद्योग, कामगार आणि मालवाहतूक कार्यरत आहे.

त्यामुळे औद्योगिक विकासाच्या गतीशी सुसंगत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन, जिल्हा प्रशासन, एमआयडीसी, पीएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएसआरडीसी, पोलीस यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्था आणि उद्योजक संघटनांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश त्यांनी दिले. उद्योजकांच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम करणाऱ्या तातडीच्या समस्या प्राधान्याने सोडविण्यासोबतच भविष्यातील गरजा लक्षात घेऊन शाश्वत पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी कालबद्ध कार्यवाही करण्यात यावी, असे उद्योगमंत्री सामंत यांनी सांगितले.

# स्वातंत्र्यदिनाच्या उत्साहात सेक्टर २६ येथे वृक्षारोपण; पर्यावरण संवर्धनाचा संकल्प

» पिंपरी | प्रतिनिधी

**"स्वातंत्र्य दिन केवळ देशाच्या स्वातंत्र्याचा उत्सव नसून, भावी पिढ्यांसाठी स्वच्छ, सुंदर आणि हिरवेगार पर्यावरण निर्माण करण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करताना निसर्गाचे स्वातंत्र्यही जपले पाहिजे," असा पर्यावरण संवर्धनाचा संदेश भारतीय जनता युवा मोर्चाचे माजी प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांनी दिला.**

१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून श्री साई मित्र परिवार आणि निसर्ग ग्रुप यांच्या वतीने सेक्टर २६, प्राधिकरण येथे मोरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध वृक्षांची लागवड केली. यावेळी उपस्थित मान्यवर व नागरिकांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. अनुप मोरे म्हणाले, "आज लावलेले एक रोप भविष्यात अनेकांना सावली, प्राणवायू आणि पर्यावरणीय संतुलन देणार आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपल्या आयुष्यात किमान काही झाडे लावून त्यांचे संगोपन करावे. पर्यावरणाचे रक्षण ही केवळ शासनाची किंवा सामाजिक संस्थांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे," असे आवाहन त्यांनी केले. श्री साई मित्र परिवार आणि निसर्ग ग्रुपच्या माध्यमातून सामाजिक



बांधिलकी जपत पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम राबविण्यात आला. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने देशभक्तीची भावना आणि पर्यावरणप्रेम यांची सांगड घालत नागरिकांनी हरित भविष्यासाठी एकत्र येण्याचा संदेश या उपक्रमातून दिला.

# हरित विकासाला वेग; महापालिकेत EV चार्जिंग स्टेशन सुरू

## महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उद्घाटन; हरित वाहतुकीला चालना

» पिंपरी | प्रतिनिधी

**शहरातील पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासह इलेक्ट्रिक वाहनांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने पिंपरी-चिंचवड महानगरपालिका मुख्यालय येथे उभारण्यात आलेल्या विद्युत वाहन (EV) चार्जिंग स्टेशनचे उद्घाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते करण्यात आले.**



> "विकास म्हणजे केवळ नवीन रस्ते, इमारती किंवा पायाभूत सुविधा उभारणे नव्हे, तर पुढील पिढ्यांसाठी स्वच्छ हवा आणि निरोगी पर्यावरण निर्माण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. इलेक्ट्रिक वाहनांचा वाढता वापर आणि त्यासाठी सक्षम चार्जिंग नेटवर्कची निर्मिती ही काळाची गरज आहे. महापालिका मुख्यालयातील EV चार्जिंग स्टेशन ही या दिशेने महत्त्वाची सुरुवात आहे. भविष्यात हरित ऊर्जा आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्वच्छ, सुंदर, पर्यावरणपूरक आणि शाश्वत पिंपरी-चिंचवड घडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."
>
> -रवि लांडगे, **महापौर, पिंपरी-चिंचवड**

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, क प्रभाग समिती अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे, शहर अभियंता मनोज सेठीया, सह शहर अभियंता अनिल भालसाखळे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेचे संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या, वाहनांची वाढती संख्या आणि त्यातून होणारे वायू प्रदूषण व कार्बन उत्सर्जन लक्षात घेता पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्थेला चालना देणे आवश्यक झाले आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या माध्यमातून इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करण्यावर भर देण्यात येत आहे. महापालिका मुख्यालयात कार्यान्वित करण्यात आलेले EV चार्जिंग स्टेशन हे त्याच दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

शहराच्या सर्वांगीण विकासासोबत पर्यावरण संरक्षण आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन यांचा समतोल राखणे आवश्यक आहे. हरित ऊर्जा, स्वच्छ हवा, कमी कार्बन उत्सर्जन आणि शाश्वत वाहतूक व्यवस्था या संकल्पनांचा स्वीकार करून पिंपरी-चिंचवडला भविष्यातील गरजांसाठी अधिक सक्षम,स्वच्छ आणि पर्यावरणपूरक शहर म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने महापालिका विविध उपाययोजना राबवत आहे.

इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढविण्यासाठी सुलभ आणि पुरेशा चार्जिंग सुविधा उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे. शहरातील विविध ठिकाणी अशा सुविधा विकसित झाल्यास नागरिकांना इलेक्ट्रिक वाहनांचा स्वीकार करणे अधिक सोयीचे होणार असून, पारंपरिक इंधनावरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होईल. त्याचबरोबर वाहनांमुळे होणारे प्रदूषण आणि कार्बन उत्सर्जन कमी करून स्वच्छ व आरोग्यदायी शहरी वातावरण निर्मितीसही हातभार लागणार आहे.

महापालिका मुख्यालयात सुरू करण्यात आलेल्या या सुविधेमुळे महापालिकेचे अधिकारी-कर्मचारी तसेच नागरिकांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराबाबत जागरूकता वाढण्यास मदत होणार आहे. शासकीय आणि सार्वजनिक संस्थांनी हरित तंत्रज्ञानाचा स्वीकार करून पर्यावरणपूरक उपक्रमांना प्रोत्साहन देणे ही शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची दिशा असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका केवळ पारंपरिक पायाभूत सुविधांच्या विस्तारापुरती मर्यादित न राहता आधुनिक तंत्रज्ञान, हरित ऊर्जा आणि पर्यावरणपूरक उपाययोजनांचा स्वीकार करून शहराच्या विकासाला अधिक शाश्वत दिशा देत आहे. यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभागही तितकाच महत्त्वाचा असून, इलेक्ट्रिक वाहनांचा स्वीकार आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीच्या माध्यमातून प्रत्येक नागरिक शहराच्या हरित भविष्यात योगदान देऊ शकतो.

> "पिंपरी-चिंचवडच्या वेगवान विकासासोबत शहराच्या पर्यावरणीय गरजांचाही गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. इलेक्ट्रिक वाहनांसाठी आवश्यक चार्जिंग सुविधांचा विस्तार ही केवळ आजची गरज नसून भविष्यातील शाश्वत शहरासाठी केलेली महत्त्वाची गुंतवणूक आहे. अशा पर्यावरणपूरक आणि आधुनिक पायाभूत सुविधांना प्राधान्य देऊन नागरिकांना अधिक सक्षम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका सातत्याने प्रयत्नशील राहील. EV चार्जिंग स्टेशनच्या माध्यमातून हरित वाहतुकीला निश्चितच अधिक चालना मिळेल."
>
> -अभिषेक बारणे, **स्थायी समिती, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

महापालिका मुख्यालयात सुरू करण्यात आलेले EV चार्जिंग स्टेशन हे केवळ एक पायाभूत सुविधा प्रकल्प नसून 'हरित, स्वच्छ, आधुनिक आणि शाश्वत पिंपरी-चिंचवड' या संकल्पनेच्या दिशेने टाकलेले आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

# रुपीनगर, तळवडे, सहयोगनगरातील समस्यांवर शितल वर्णेकर आक्रमक

» पिंपरी | प्रतिनिधी

**तळवडे- रुपीनगर, तळवडे, सहयोग नगरसह चिखली परिसरातील विविध नागरी समस्यांबाबत स्थायी समिती सदस्या तथा नगरसेविका शितल वर्णेकर यांनी प्रशासनाकडे आक्रमकपणे पाठपुरावा सुरू केला आहे. नागरिकांना भेडसावणाऱ्या मूलभूत समस्यांचे तातडीने निराकरण करावे, अशी मागणी त्यांनी फ प्रभाग क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.**



या चारही परिसरातील नागरिकांकडून विविध नागरी समस्यांबाबत सातत्याने तक्रारी प्राप्त होत असून, नागरिकांना मूलभूत सुविधा वेळेत व दर्जेदार स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी, अशी मागणी वर्णेकर यांनी केली आहे. आरोग्य विभागामार्फत स्वच्छता, फॉगिंग, कचरा संकलन आणि इतर प्रलंबित समस्यांचे तातडीने निराकरण करण्याची मागणी त्यांनी केली आहे. परिसरात नियमित आणि पुरेसा शुद्ध पाणीपुरवठा सुनिश्चित करण्याबरोबरच पाणीपुरवठ्याशी संबंधित तक्रारींचेही निराकरण करण्याची सूचना करण्यात आली आहे. तसेच ड्रेनेज व सांडपाणी व्यवस्थेतील त्रुटी दूर करून तुंबलेल्या गटारी व चेंबरची नियमित स्वच्छता करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. स्थापत्य विभागाने प्रलंबित विकासकामे मार्गी लावावीत, रस्त्यांवरील खड्डे बुजवावेत, खराब झालेले रस्ते व पदपथांची तातडीने दुरुस्ती करावी, असेही निवेदनात नमूद आहे. सार्वजनिक रस्ते व पदपथांवर झालेल्या अनधिकृत टपऱ्या, अतिक्रमणे तसेच नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या अनधिकृत बांधकामांवर नियमानुसार तात्काळ कठोर कारवाई करावी, अशी मागणी नगरसेविका शितल वर्णेकर यांनी केली आहे. तसेच बंद अथवा खराब झालेले पदपथ तातडीने दुरुस्त करून आवश्यक त्या ठिकाणी नवीन पदपथ उभारावेत, अशीही मागणी त्यांनी केली. परिसरातील विविध नागरी समस्यांवर तातडीने कार्यवाही करून करण्यात आलेल्या उपाययोजनांचा सविस्तर अहवाल प्रशासनाने उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

> "रुपीनगर, तळवडे, सहयोगनगर आणि त्रिवेणीनगर परिसरातील नागरिकांना मूलभूत सुविधा मिळणे हा त्यांचा हक्क आहे. स्वच्छता, पाणीपुरवठा, ड्रेनेज, रस्ते, पदपथ आणि अतिक्रमणांसारख्या प्रश्नांकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहून तातडीने कार्यवाही करावी. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित या समस्या प्रलंबित ठेवून चालणार नाही. संबंधित विभागांनी वेळेत कामे पूर्ण करून त्याचा अहवाल द्यावा, यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करणार आहोत."
>
> -शितल वर्णेकर, **नगरसेविका, भाजपा.**

# महापालिका मुख्यालयात डेंग्यू-मलेरिया प्रतिबंधासाठी तपासणी मोहीम

## कूलर, कुंड्या, पाण्याच्या टाक्यांसह पाणी साचणाऱ्या ठिकाणांची पाहणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पावसाळ्यात डेंग्यू, मलेरियासारख्या आजारांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य व वैद्यकीय विभागाच्या वतीने महापालिका मुख्यालय परिसरात विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या वेळी मुख्य इमारतीसह महापालिका आवारातील कूलर, शोभेच्या झाडांच्या कुंड्या, पाण्याच्या टाक्या तसेच पाणी साचण्याची शक्यता असलेल्या विविध ठिकाणांची पाहणी करण्यात आली.**



महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

डेंग्यू मलेरिया प्रतिबंधासाठी आजार झाल्यानंतर उपचार करण्यापेक्षा डासांची उत्पत्तीस्थळे वेळीच नष्ट करणे अधिक प्रभावी ठरते. त्यामुळे महापालिका मुख्यालयासह सर्व शासकीय व सार्वजनिक आस्थापनांच्या परिसरात डासांची उत्पत्तीस्थळे निर्माण होणार नाहीत, याची दक्षता घेण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या. तसेच नागरिकांनी घर, कार्यालय आणि परिसरात पाणी साचू न देण्याबरोबरच कूलर, कुंड्या, पाण्याच्या टाक्या आदींची नियमित स्वच्छता करावी, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

तपासणीदरम्यान कूलरमधील पाणी, कुंड्यांखालील ट्रे, पाण्याच्या टाक्या, वापरात नसलेली भांडी, शोभेच्या झाडांच्या कुंड्या, कार्यालयीन परिसर, वाहनतळ तसेच अन्य ठिकाणी पाणी साचले आहे का, याची पाहणी करण्यात आली. ज्या ठिकाणी पाणी साचलेले आढळून आले, तेथील पाणी तत्काळ काढून टाकण्याच्या सूचना देण्यात आल्या. परिसरात स्वच्छता राखण्यासह भविष्यात पाणी साचणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना करण्यात आल्या तसेच, महापालिकेकडून डेंग्यू मलेरिया तपासणी मोहिम वेळोवेळी राबविण्यात येणार आहे.

आरोग्य व वैद्यकीय विभागाच्या पथकांनी महापालिका मुख्यालयातील विविध विभाग, कार्यालयीन परिसर, वाहनतळ आणि आजूबाजूच्या परिसराची पाहणी केली. डासांची उत्पत्तीस्थळे नष्ट करण्याबरोबरच अधिकारी व कर्मचाऱ्यांना डेंग्यू मलेरिया प्रतिबंधासाठी आवश्यक खबरदारीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

पावसाचे पाणी दीर्घकाळ साचून राहिल्यास डासांची उत्पत्ती होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे नागरिकांनी आपल्या घरासह कार्यालय व परिसराची नियमित पाहणी करून पाणी साचणार नाही, याची दक्षता घ्यावी. डासांची उत्पत्तीस्थळे वेळीच नष्ट करून डेंग्यू मलेरियाचा प्रसार रोखण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांना नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या वेळी आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. संध्या भोईर, वैद्यकीय अधिकारी (एनयूएचएम) डॉ. विजया आंबेडकर, सहा.आरोग्य अधिकारी श्रीराम गायकवाड, प्रशासन अधिकारी संतोष कोराड, साथरोग अधिकारी डॉ. आनंदऋषी परिमल्ला, मुख्य आरोग्य निरीक्षक वैभव घोळवे, कांचनकुमार इंदलकर,स्नेहा चांदणे, राहुल जेटीथोर, सिटी प्रोग्राम मॅनेजर चैताली इंगळे यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# चॅलेंजर पब्लिक स्कूलमध्ये देशभक्तीच्या जल्लोषात स्वातंत्र्यदिन साजरा!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**चॅलेंजर पब्लिक स्कूल येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन देशभक्ती, उत्साह आणि अभिमानाच्या वातावरणात मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. तिरंग्याच्या रंगांनी सजलेल्या शाळेच्या परिसरात स्वातंत्र्यदिना निमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

या कार्यक्रमाला शाळेचे अध्यक्ष संदीप काटे, मुख्याध्यापिका ज्योतिका मलकानी, मान्यवर पाहुणे, शिक्षकवृंद आणि पालक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, नृत्य, भाषणे तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांमध्ये देशप्रेमाची भावना जागृत केली. विद्यार्थ्यांच्या दमदार आणि मनमोहक सादरीकरणातून देशप्रेम, राष्ट्रभक्ती तसेच भारतीय संस्कृतीची सुंदर झलक पाहायला मिळाली. विविध कार्यक्रमांना उपस्थित मान्यवर आणि पालकांनी उत्स्फूर्त दाद देत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. अध्यक्ष संदीप काटे आणि मुख्याध्यापिका सौ. ज्योतिका मलकानी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांचा उत्साह वाढवला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देशाच्या स्वातंत्र्याचे महत्त्व, स्वातंत्र्यसैनिकांनी केलेले बलिदान आणि जबाबदार नागरिक म्हणून पार पाडावयाची कर्तव्ये यांची जाणीव करून देण्यात आली. देशाच्या प्रगतीसाठी एकता, शिस्त आणि सामाजिक जबाबदारीची भावना जपण्याचा संदेशही यावेळी देण्यात आला. शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांच्या सहभागामुळे स्वातंत्र्यदिनाचा हा सोहळा संस्मरणीय ठरला.

# दत्ताकाका साने जयंतीनिमित्त चिखलीत रक्तदान शिबिर; ४५० जणांचे रक्तदान

**पिंपरी | प्रतिनिधी**

**कार्यसम्राट नगरसेवक स्वर्गीय दत्ताकाका साने यांच्या जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले मनपा शाळा, मोरेवस्ती येथे भव्य महारोग्य शिबीर आणि रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिराला स्थानिक नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला असून तब्बल ४५० रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.**

**या वेळी प्रोत्साहनपर आकर्षक ट्रॅव्हल बॅग भेट म्हणून देण्यात आली.**




या महाआरोग्य शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांच्या सहकार्याने मोफत हृदयरोग तपासणी, ईसीजी, मोफत नेत्र व मोतीबिंदू तपासणी, दंत तपासणी, त्वचारोग निदान, तसेच रक्त तपासणी व विविध प्रकारच्या जनरल आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. अनेक गरजू रुग्णांना मोफत औषधोपचार आणि पुढील उपचारांविषयी मार्गदर्शनही देण्यात आले. सदर समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे शिक्षण समिती सदस्य तथा नगरसेवक यश दत्ताकाका साने यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यसम्राट नगरसेवक दत्ताकाका साने प्रतिष्ठान, राजमाता जिजाऊ सहकारी पतसंस्था मर्यादित, वीर अभिमन्यू फ्रेंड सर्कल तसेच साने चौक व तळगाव चिखली येथील समस्त ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. परिसरातील हजारो नागरिकांनी उपस्थित राहून या आरोग्य शिबिराचा लाभ घेतला.

# सिंहगडावर पर्यटकांची हाणामारी; दगडफेकीने गोंधळ

## सिंहगडावर पर्यटकांची प्रचंड गर्दी; किरकोळ वादाचे रुपांतर तुफान हाणामारीत

**» पुणे | प्रतिनिधी**

**पुण्यातील ऐतिहासिक सिंहगडावर स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती. याच गर्दीत दोन गटांमध्ये जोरदार हाणामारी झाल्याची घटना समोर आली आहे. वाद वाढल्यानंतर दगडफेकही झाल्याची माहिती असून, या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.**





१५ ऑगस्ट रोजी सिंहगडावर हजारो पर्यटक दाखल झाले होते. त्यामुळे गडावर तसेच गडावरून खाली येणाऱ्या रस्त्यावर मोठी गर्दी झाली होती. अनेक ठिकाणी पर्यटकांची कोंडी झाली होती. याच गर्दीत दोन गटांमध्ये सुरुवातीला वाद झाला आणि त्यानंतर त्याचे रूप हाणामारीत झाल्याचे सांगितले जात आहे.

व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये काही तरुण एकमेकांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण करताना दिसत आहेत. काही जण दगड-गोटे उचलून एकमेकांवर फेकताना दिसत असून, या प्रकारामुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

या घटनेत काही जण जखमी झाल्याची माहिती आहे. मात्र, नेमके किती जण जखमी झाले आणि वाद नेमका कशामुळे सुरू झाला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. याप्रकरणी हवेली पोलीस तपास करत आहेत.

सिंहगडावरील मोठ्या गर्दीचा काही टवाळखोरांकडून गैरफायदा घेतला जात असल्याचा आरोप काही पर्यटकांनी केला आहे. गर्दीत महिला आणि तरुणींशी असभ्य वर्तन तसेच जाणीवपूर्वक चुकीचा स्पर्श केल्याचे दावेही करण्यात आले आहेत.

कुटुंबासह किंवा मित्र-मैत्रिणींसोबत गडावर आलेल्या पर्यटकांना अशा प्रकारांमुळे त्रास सहन करावा लागल्याचे सांगण्यात येत आहे. या आरोपांबाबत पोलिसांच्या तपासानंतर अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

दोन गटांमधील वाद वाढल्यानंतर दगडफेक झाल्याने आजूबाजूच्या पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. गर्दीच्या ठिकाणी अशा प्रकारे दगडफेक झाल्याने इतर पर्यटकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

दरम्यान, सिंहगडाचे पावित्र्य आणि स्वच्छता राखण्यासाठी कार्यरत असलेल्या काही कार्यकर्त्यांनी एका पर्यटकाला गुटखा खाल्ल्याच्या आरोपावरून १०० उठाबशा काढण्याची शिक्षा दिल्याचा प्रकारही समोर आला आहे.

स्वातंत्र्यदिनासारख्या सुट्टीच्या दिवशी सिंहगडावर मोठ्या प्रमाणात पर्यटक येणार असल्याचा प्रशासनाला अंदाज असतो. त्यामुळे अशा दिवशी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त, गर्दीचे योग्य नियोजन आणि संवेदनशील ठिकाणी सुरक्षा व्यवस्था वाढवण्याची गरज असल्याचे पर्यटकांचे म्हणणे आहे.

सिंहगडावर एकावेळी ठराविक संख्येनेच पर्यटकांना प्रवेश देणे, गर्दीचे नियोजन करणे आणि सुरक्षेसाठी अतिरिक्त उपाययोजना करणे आवश्यक असल्याची मागणी आता पुढे येत आहे.

ऐतिहासिक वारसा असलेल्या सिंहगडावर पर्यटकांची सुरक्षितता, स्वच्छता आणि शिस्त राखण्यासाठी प्रशासन कोणत्या उपाययोजना करते, याकडे आता पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

# पीएमपीचा ताफा २ हजारांपार; नव्या ई-बसने प्रवाशांना दिलासा

**» पुणे | प्रतिनिधी**

**पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम आणि प्रभावी करण्यासाठी पीएमपीएमएलच्या ताफ्यात नव्या इलेक्ट्रिक बस दाखल होत आहेत. नुकत्याच ८३ नवीन ई-बस सेवेत दाखल झाल्या असून, आणखी ३२ बस महिनाअखेरपर्यंत प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहेत. त्यामुळे सार्वजनिक वाहतुकीचा विस्तार होण्यास मदत होणार असून, प्रवाशांना अधिक बस उपलब्ध होण्याची शक्यता आहे.**




या ११५ नवीन इलेक्ट्रिक बसमुळे पीएमपीएमएलचा एकूण ताफा २ हजार ७१ बसपर्यंत पोहोचणार आहे. ताफ्यात वाढ झाल्यामुळे शहरातील विविध मार्गांवरील बसफेऱ्यांची संख्या वाढविणे शक्य होणार आहे. विशेषतः सकाळी आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत प्रवाशांना अधिक बस उपलब्ध होण्यास मदत होईल. त्यामुळे बसची प्रतीक्षा करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासोबतच पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी पीएमपीएमएलकडून इलेक्ट्रिक बसचा वापर वाढविला जात आहे. प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीनेही इलेक्ट्रिक बस महत्त्वाच्या ठरत असून, नवीन ई-बस टप्प्याटप्प्याने पीएमपीएमएलच्या ताफ्यात दाखल करण्यात येत आहेत.

यापूर्वी पीएमपीएमएलच्या ताफ्यात सुमारे १,९०० बस उपलब्ध होत्या. त्यामुळे गर्दीच्या वेळेत अनेक मार्गांवर प्रवाशांची मोठी गर्दी होत होती. काही मार्गांवर बससाठी प्रवाशांना बराच वेळ प्रतीक्षा करावी लागत होती. आता ताफ्यात ११५ नव्या इलेक्ट्रिक बसची भर पडल्याने बससेवेची उपलब्धता वाढण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रवाशांचा दैनंदिन प्रवास अधिक सुलभ आणि सोयीस्कर होण्याची शक्यता आहे.

नवीन बस दाखल झाल्यानंतर शहरातील प्रवाशांची अधिक वर्दळ असलेल्या मार्गांवर बसफेऱ्या वाढविण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर सध्या उपलब्ध असलेल्या बसचे मार्गनिहाय नियोजनही अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. वाढत्या लोकसंख्येसोबतच सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणाऱ्या प्रवाशांची संख्या लक्षात घेता पीएमपीएमएलच्या ताफ्यात झालेली ही वाढ महत्त्वाची मानली जात आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील अनेक नागरिक दररोज काम, शिक्षण आणि इतर कारणांसाठी पीएमपीएमएलच्या बससेवेचा वापर करतात. त्यामुळे बसची संख्या वाढल्यास नियमित प्रवाशांना त्याचा थेट फायदा होण्याची शक्यता आहे. विशेषतः गर्दीच्या वेळेत अतिरिक्त बस उपलब्ध झाल्यास प्रवाशांची गर्दी कमी करण्यास मदत होऊ शकते.

पीएमपीएमएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांनी सांगितले की, नुकत्याच ८३ इलेक्ट्रिक बस ताफ्यात दाखल झाल्या आहेत. उर्वरित ३२ बस महिनाअखेरपर्यंत प्रवाशांच्या सेवेत दाखल होतील. त्यामुळे पीएमपीएमएलच्या ताफ्यातील बसची संख्या २ हजार ७१ पर्यंत पोहोचणार आहे. ताफा वाढल्यामुळे प्रवाशांना अधिक चांगली आणि नियमित सेवा देणे शक्य होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### पुणेकरांच्या सेवेत नव्या ई-बस!

८३ नवीन इलेक्ट्रिक बस प्रवाशांच्या सेवेत दाखल झाल्या असून, आणखी ३२ ई-बस महिनाअखेरपर्यंत सेवेत दाखल होणार आहेत. या नव्या बसमुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. सर्व ११५ बस सेवेत आल्यानंतर पीएमपीएमएलचा एकूण ताफा २,०७१ बसवर पोहोचणार असून, गर्दीच्या वेळेत प्रवाशांना अधिक बसफेऱ्या उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.